# तुमचे अधिकार जाणून घ्या

## डी. के. बासू विरुद्ध पश्चिम बंगाल सरकार खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्त्वे
## अटक आणि ताब्यात घेणे

अटक झालेल्या सर्व व्यक्तींना संविधानिक अधिकार असतात. पोलिस कस्टडीत कोणालाही गैरवागणूक देता येत नाही.

अटक आणि ताब्यात घेण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रकरणात पोलिसांनी अमलात आणायची मार्गदर्शक सूत्रे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेली आहेत. अटक झालेल्या सर्व व्यक्तींना त्यांचे संविधानिक अधिकार आणि पोलिसांनी त्यांच्या प्रति असलेली कर्तव्ये माहीत असण्यासाठी ही मार्गदर्शक सूत्रे माहीत असणे महत्त्वाचे आहे.

**मार्गदर्शक सूत्रे पुढीलप्रमाणे आहेत :**

### अटक करताना आणि चौकशी हाताळताना पोलिसांसाठीची कर्तव्ये :
- सर्व पोलिस कर्मचाऱ्यांनी त्यांचे नाव आणि पद दर्शविणारे घातलेली नामपट्टी दिसायला हवी.
- पोलिस कर्मचारी करत असलेल्या चौकशीची सर्व माहितीची रजिस्टरमध्ये पोलिसांनी नोंद केलीच पाहिजे.

### अटक मेमो :
- जो पोलिस अधिकारी अटक करेल त्याने संबंधित अटकेची माहिती असणारा अटक मेमो तयार केला पाहिजे.
- अटक मेमोमध्ये पुढील बाबी असायला हव्यात :
  अ. किमान एका साक्षीदाराची स्वाक्षरी हवी, हा साक्षीदार अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचा नातेवाईक किंवा ज्या परिसरात अटक करण्यात आली आहे त्या परिसरातील सन्माननीय व्यक्ती असला पाहिजे.
  ब. अटकेची वेळ, दिवस आणि जागा.
- अटक मेमो व्यवस्थित तयार करण्यात आल्यानंतर अटक करण्यात आलेल्या व्यक्तीने त्या अटक मेमोवर सही केली पाहिजे.

### निरीक्षण मेमो :
- अटक करण्यात आलेल्या व्यक्तीने जर विनंती केली तर अटक करणाऱ्या अधिकाऱ्याने अटक झालेल्या पुरुष/स्त्रीच्या शरीरावरील लहान/मोठ्या जखमांची नोंद निरीक्षण मेमोमध्ये केली पाहिजे.
- मेमोरँडमवर अटक करण्यात आलेली व्यक्ती आणि अटक करणारा अधिकारी यांच्या सह्या असल्या पाहिजेत.
- अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला मेमोची एक प्रत देण्यात आली पाहिजे.

### अटक आणि स्थानबद्धतेविषयीची माहिती :
- अटकेची माहिती त्याच्या किंवा तिच्या नातेवाईक किंवा मित्रांना कळवण्याचा अधिकार अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला आहे.
- पोलिसांनी अटक केलेल्या व्यक्तीच्या नातेवाईक किंवा मित्रांना लवकरात लवकर संपर्क करून संबंधित व्यक्तीच्या अटकेची वेळ आणि अटकेचे स्थळ आणि ज्या ठिकाणी अटक केलेली आहे ते निश्चित ठिकाण याची माहिती दिली पाहिजे.
- जर अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नातेवाईक किवा मित्र जर दुसऱ्या जिल्ह्यात किंवा शहरात असतील तर संबंधित पोलिस स्टेशनला टेलिग्राफद्वारे अटकेच्या ८ ते १२ तासांच्या आता माहिती दिली पाहिजे आणि अटक करण्यात आलेल्या व्यक्तीच्या नातेवाईक किंवा मित्रांपर्यंत ती माहिती पोचवण्यात आली पाहिजे.
- अटकेची माहिती जिल्ह्याच्या कायदेशीर सल्लागार समितीमार्फत पाठवण्यात आली पाहिजे.

### दैनंदिन डायरी :
- पोलिसांनी प्रत्येक अटकेची माहिती पोलिस स्टेशनमधील दैनंदिन डायरीमध्ये केली पाहिजे.
- अटक करण्यात आलेल्या व्यक्तीच्या ज्या नातेवाइकाला किंवा मित्राला अटकेची माहिती देण्यात आली त्याचे नाव डायरीमध्ये नोंदवले पाहिजे.
- ज्या पोलिस अधिकाऱ्याच्या कस्टडीमध्ये अटक केलेल्या व्यक्तीला ठेवण्यात आले आहे त्या पोलिस अधिकाराचे नाव डायरीमध्ये नोंदवले पाहिजे.

### वैद्यकीय तपासणी :
- प्रत्येक ४८ तासांनी प्रशिक्षित डॉक्टरद्वारे वैद्यकीय चाचणी करण्याचा अधिकार अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला आहे.
- वैद्यकीय तपासणी करणारा डॉक्टर राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या आरोग्यसेवेच्या संचालकांनी निवडलेल्या पॅनेलमधील असला पाहिजे.
- राज्याच्या किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या आरोग्यसेवेच्या संचालकांनी सर्व तालुक्यांसाठी आणि जिल्ह्यांसाठी पॅनेलची स्थापना केली पाहिजे.

### वकिलासंबंधी अधिकार :
- पोलिस चौकशीदरम्यान वकिलाला भेटण्याचा आणि त्याचा सल्ला घेण्याचा अधिकार अटक झालेल्या व्यक्तीला आहे. पोलिस याला नकार देऊ शकत नाहीत.

### इलाखा मॅजिस्ट्रेट : (प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी)
- पोलिसांनी अटकेशी संबंधित सर्व कागदपत्रांची (अटक मेमो आणि निरीक्षण मेमोसह) एक प्रत इलाखा मॅजिस्ट्रेला (विभागीय न्यायदंडाधिकारी) पाठवली पाहिजे.

### पोलिस नियंत्रण कक्ष :
- राज्याच्या राजधानीत आणि सर्व जिल्ह्यांमध्ये पोलिस नियंत्रण कक्षाची उभारणी केली पाहिजे.
- अटक झालेल्या व्यक्तीच्या अटकेची माहिती अटक करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याने नियंत्रण कक्षाला कळवली पाहिजे. सर्व अटकांच्या बाबतीत याची अंमलबजावणी झाली पाहिजे.
- अटक झाल्याची माहिती अटक केल्यानंतर १२ तासांच्या आत नियंत्रण कक्षाला कळवण्यात आली पाहिजे.
- नियंत्रण कक्षाच्या नोटीस बोर्डवर ही माहिती ठळकपणे मांडण्यात आली पाहिजे.

**या सर्व सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. यांची अंमलबजावणी करण्यास नकार देणे हा न्यायालयाचा अवमान आहे. जे पोलिस कर्मचारी या सूचनांची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांना खात्याअंतर्गत कारवाईस सामोरे जावे लागेल.**